**वाचले**

१ मा.सहाय्यक आयुक्त,सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील पत्र क्र.साप्रवि/१८/कावि/४५१/२०२४,दि.१२/०४/२०२४

२ महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १०(१)

३ मा.आयुक्त यांचेकडील दिनांक १६/०४/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८,
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/३अ/कावि/२१/२०२४
दिनांक १६/०४/२०२४

**विषय :- श्री.जगताप उल्हास बबनराव, "अतिरिक्त आयुक्त" यांचे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीबाबत... (सं.क्र.३२८)**

**आदेश,**

श्री.जगताप उल्हास बबनराव हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर "फायरमन" या पदावर दिनांक ०५/०४/१९८८ रोजी रुजू झाले असून सद्यस्थितीमध्ये "अतिरिक्त आयुक्त" गट 'अ' मधील पदावर कार्यरत आहेत श्री.जगताप उल्हास बबनराव, "अतिरिक्त आयुक्त" यांची जन्मतारीख २५/०६/१९६६ अशी असून दिनांक ३०/०६/२०२४ रोजी त्यांच्या वयास ५८ वर्षे पूर्ण होत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १०(१) मधील तरतूदीनुसार श्री.जगताप उल्हास बबनराव, "अतिरिक्त आयुक्त" यांना दिनांक ३०/०६/२०२४ रोजी मध्यान्होत्तर महानगरपालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

श्री.जगताप उल्हास बबनराव, "अतिरिक्त आयुक्त" हे महापालिका सेवेत रूजू झाल्याचे तारखेपासून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे तारखेपर्यंत म्हणजे दिनांक ३०/०६/२०२४ पर्यंत त्यांची एकूण ३६ वर्ष २ महिने २५ दिवस इतकी सेवा पूर्ण होत आहे.

श्री.जगताप उल्हास बबनराव, "अतिरिक्त आयुक्त" यांचेकडून महानगरपालिकेस घरबांधणी अग्रिम, घर दुरुस्ती अग्रिम, संगणक अग्रिम, वाहन अग्रिम, कामगार कल्याण निधी अग्रिम, वैद्यकीय अग्रिम, मनपा पतसंस्थेचे कर्ज किंवा इतर कोणत्याही प्रकारचे येणे बाकी नसून सद्यस्थितीत त्यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसलेने उपरोक्त वाचले क्र.१ चे पत्रान्वये विभागप्रमुखांनी श्री. जगताप उल्हास बबनराव, "अतिरिक्त आयुक्त" यांना नियत वयोमानाने सेवानिवृत्त करणेबाबत स्पष्टपणे शिफारस केली आहे.

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील तरतूद विचारात घेता श्री.जगताप उल्हास बबनराव, "अतिरिक्त आयुक्त" यांना दिनांक ३०/०६/२०२४ रोजी मध्यान्होत्तर महानगरपालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करण्यास प्रस्तुत आदेशान्वये मान्यता देत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री.जगताप उल्हास बबनराव, "अतिरिक्त आयुक्त" यांचे सेवानोंद पुस्तकात घेणेत यावी.

( शेखर सिंह )
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रति - श्री.जगताप उल्हास बबनराव, "अतिरिक्त आयुक्त"

प्रत - लेखा विभाग

२/- श्री.जगताप उल्हास बबनराव, "अतिरिक्त आयुक्त" यांचेकडून महानगरपालिकेस येणे असलेली रक्कम त्यांना देय असणा-या रकमेतून वजा करुन उर्वरित रकमा त्यांना त्वरीत अदा करण्याची कार्यवाही करणेत यावी.

१.लेखापरिक्षण विभाग २.दूरसंचार विभाग ३.माहिती व जनसंपर्क विभाग
४.कामगार कल्याण विभाग ५.माहिती व तंत्रज्ञान विभाग
६. सामान्य प्रशासन टेबल क्र. ७, ९, १०, १२, १४, १६, २२, संगणक कक्ष ७.पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघ
८.पिं.चिं.मनपा कर्मचारी पतसंस्था ९.सर्व संबंधित विभाग